महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३३८ वा | दिनांक : २२/११/२०२५ | वार : शनिवार

## मनसे सोडा, आमच्यासोबत या! काँग्रेसची उद्धव ठाकरेंना ऑफर



**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडी पुन्हा एकदा रंगत आहेत. महाविकास आघाडीतून वेगळे पडलेल्या मुद्द्यांना आज पुन्हा नवी दिशा मिळू लागली आहे. काँग्रेसमधील काही वरिष्ठ नेत्यांनी उद्धव ठाकरे यांना मनसेची साथ सोडून पुन्हा काँग्रेससोबत येण्याची ऑफर दिल्याची माहिती सूत्रांकडून समजते. उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या काळात काँग्रेसला विश्वासात न घेता मनसेसोबत संपर्क वाढवल्याने काँग्रेसमध्ये निर्माण झालेली नाराजी अद्याप पूर्णपणे निवळलेली नाही. त्यामुळेच काँग्रेसने एकला चलो रेची तयारी सुरू केली होती. मात्र आता पुन्हा उद्धव ठाकरेंशी संवादाचे दरवाजे उघडण्याची तयारी दिसत आहे.
काँग्रेसने आधीच मुंबई महापालिका स्वतंत्रपणे लढण्याची भूमिका जाहीर केली आहे. तरीही सूत्रांच्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे जर मनसेसोबतची जाण्याची शक्यता संपुष्टात आणून काँग्रेससोबत आले, तर काँग्रेस स्वबळाबाबत पुनर्विचार करू शकते. मात्र त्यासाठी काही ठोस शर्तींची अट काँग्रेस ठेवू शकते, अशी चर्चा आहे. दुसरीकडे, मनसे या चर्चेने अजिबात विचलित झालेली नाही, असे दिसते. मनसे नेते संदीप देशपांडे म्हणाले की, मनसे हा स्वतंत्र पक्ष आहे. आमचे निर्णय राज ठाकरे घेतील. इतर कोण काय म्हणतात याचा आमच्याशी संबंध नाही.

दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीची फूट टाळण्यासाठी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार स्वतः पुढे आल्याची माहिती मिळते. पवारांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशी फोनवर चर्चा केली असून, मुंबई महापालिकेत महाविकास आघाडीचे सर्व घटक एकत्र लढावेत अशी त्यांची इच्छा असल्याची माहिती राष्ट्रवादी सूत्रांनी दिली. मतदार यादीतील घोळ आणि मतचोरीच्या मुद्द्यांवर सर्व पक्ष एकत्र आंदोलन करत असताना, निवडणुकीदरम्यान वेगळे लढल्यास त्याचा संदेश चुकीचा जाईल, असे पवारांचे मत असल्याचे सांगितले जात आहे.

मनसेला महाविकास आघाडीत सामावून घेण्याबाबत शरद पवार सकारात्मक आहेत, अशीही माहिती समोर आली आहे. महापालिकेत भाजपविरोधात मजबूत लढा देण्यासाठी सर्व शक्य पर्याय खुले ठेवण्याची भूमिका पवारांनी घेतल्याचे दिसते. मात्र याच मुद्द्यावर काँग्रेसचा विरोध कायम आहे. काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले की, काँग्रेस फक्त समविचारी पक्षांसोबतच निवडणूक लढवेल. मनसेसोबत जाण्याचा प्रश्नच नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार, रिपब्लिकन पक्षातील अनेक गट देखील काँग्रेससोबत येण्यासाठी तयार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेसंदर्भात काँग्रेस सोमवारी किंवा मंगळवारी महत्त्वाची बैठक घेण्याची शक्यता आहे. शरद पवारांनी व्यक्त केलेल्या भूमिकेवर काँग्रेस आतल्या बैठकीत निर्णय घेऊ शकते. उद्धव ठाकरे मनसेसोबतची चर्चा पुढे नेत राहतील का, की काँग्रेसच्या नव्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देतील, याकडे आता सर्वांचे लक्ष आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक ही राज्यातल्या आगामी राजकीय समीकरणांसाठी निर्णायक ठरणार असल्याने पुढील काही दिवसांत महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडण्याची चिन्हे दिसत आहेत.

## मराठा आरक्षणाच्या वैधतेवर उच्च न्यायालयात निर्णायक सुनावणी सुरू




**मुंबई :** उच्च न्यायालयात मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC) या गटाखाली दिलेल्या १० टक्के आरक्षणाच्या वैधतेबाबत दाखल याचिकेवर आज सविस्तर सुनावणी झाली. महाराष्ट्रासह सर्वच स्तरांवर या प्रश्नावर मोठी चर्चा सुरू असताना, न्यायालयातील आजची प्रक्रिया विशेष लक्षवेधी ठरली. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सादर केलेल्या युक्तिवादांमुळे सुनावणी अधिकच गंभीर व महत्त्वाची बनली. आरक्षणाची आवश्यकता, मागासलेपणाचे निकष आणि मराठा समुदायाचे वास्तविक सामाजिक-आर्थिक स्थान यासंबंधी मांडण्यात आलेल्या मुद्द्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधून घेतले. सुमारे दीड तास चाललेल्या या सुनावणी दरम्यान दोन्ही बाजूंनी विविध कायदेशीर कागदपत्रांचा संदर्भ देत आपापली मते मांडली.

पहिल्या टप्प्यात याचिकाकर्त्यांचे वकील प्रदीप संचेती यांनी मराठा आरक्षणावर आक्षेप नोंदविताना प्रामुख्याने रोजगाराच्या संधींमध्ये मराठा समाजाचे विद्यमान अस्तित्व या मुद्द्यावर भर दिला. त्यांनी दाखल केलेल्या आकडेवारीत राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये मराठा समाजातील तरुणांची संख्या इतर समाजांच्या तुलनेत अधिक असल्याचे नमूद करण्यात आले. यामुळे जर एखाद्या समाजाचे सरकारी नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व आधीच लक्षणीयरीत्या जास्त असेल, तर त्यांना अतिरिक्त आरक्षणाची गरज का भासावी? असा थेट प्रश्न संचेती यांनी कोर्टासमोर उपस्थित केला. आरक्षणाचा उद्देश सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास समूहांना मागासलेपणातून बाहेर काढून समान संधी उपलब्ध करून देणे हा असतो, परंतु मराठा समाजाच्या बाबतीत ही आवश्यकता सिद्ध करण्यासारखी परिस्थितीच नाही, असा दावा त्यांनी केला.

यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने जयश्री पाटील यांच्या याचिकेवर दिलेल्या ऐतिहासिक निकालातील मुद्द्यांचा आधार घेत युक्तिवाद पुढे चालवला. त्यांनी स्वतःला स्वतःच कोणताही समाज मागास घोषित करू शकत नाही हा सर्वोच्च न्यायालयात नोंदलेला मुद्दा पुन्हा अधोरेखित केला. तसेच सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण पुरेसे नाही, ते परिस्थितीचे संपूर्ण चित्र दाखवत नाही, असेही मत त्यांनी मांडले. मराठा समाज मागास असल्याचे सिद्ध करण्यासाठी जे असाधारण व अपवादात्मक परिस्थितीचे निकष आवश्यक असतात, ते या प्रकरणात पूर्ण होत नाहीत, असे स्पष्टपणे सांगण्यात आले. यावेळी इंदिरा साहनी प्रकरणातील ५० टक्क्यांच्या मर्यादेचा संदर्भ देत, मराठा आरक्षण देताना ही मर्यादा ओलांडल्याचेही स्मरण करून देण्यात आले.

## पार्थ पवार प्रकरणात चौकशी हीच मोठी गोष्ट : सत्य फार काळ लपणार नाही, सत्ता बदलली की चित्र बदलेल - अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** पार्थ पवारांच्या प्रकरणात चौकशी होत आहे हीच मोठी गोष्ट आहे. जसे पार्थ पवार नाही तसे शितल तेजवाणी पण नाही असे अजून म्हणायची वेळ आलेली नाही, पण लवकरच ती वेळ येईल. त्यामुळे चौकशी झाली हेच फार मोठे भाग्य आहे, असे ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. तर चौकशीतून काय बाहेर आले याचे उत्तर सरकारला द्यावेच लागणार आहे, सत्य फार काळ लपणार नाही. काहीही झाले तरीही या प्रकरणातून पार्थ पवार सुटणार नाहीच.
अंबादास दानवे म्हणाले की, पार्थ पवार हे ९९ टक्के भागीदार आहे त्यांना वाचवले जात आहे. सत्ता आहे तो पर्यंत हे सर्व चालेल नंतर कधी कुणाला उचलणार हे कळणार सुद्धा नाही, असा इशाराही दानवेंनी दिला आहे. शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस अनेक ठिकाणी एकत्र लढत आहे. एखाद्या ठिकाणी एकत्र नसेल पण महायुतीला बाजूला करायचे असेल तर एकत्र लढणे गरजेचे आहे, नाही तर त्यांची मस्ती सहन करावी असे दानवेंनी म्हटले आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, राजकीय नेत्यांचे नातेवाईक बिनविरोध निवडून आले हे काही जनतेच्या मनातील विजय नाहीत. हे सत्ता आणि संपत्ती आणि धाक दाखवून मिळवलेले विजय आहेत. अनगरमध्ये जिथे राजन पाटलांची सून निवडून आली तिथे दुसऱ्या महिला उमेदवाराला अर्ज भरण्यासाठी पोलिस संरक्षण घ्यावे लागते हेच लोकशाही तडफडत असल्याचे उदाहरण आहे.नगराध्यक्ष बिनविरोध निवडून येणं म्हणजे काही मोठा तीर मारणे आहे असे मी समजत नाही, थोडासा विरोध असलाच पाहिजे. अर्ज दाखल केलेल्यांना त्रास देत निवडणूक बिनविरोध करण्यात येत आहे हा सर्व यंत्रणेचा गैरवापर सुरू आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, सलील देशमुख यांच्या अजित पवार गटात प्रदेशाबद्दल मला काही माहिती नाही. पण अनिल देशमुख हे शरद पवार यांच्यासोबत निष्ठेने राहणारे नेते आहेत. त्यांनी काही गुन्हा नसताना कारागृहात जाणे पसंद केले. ईडीने त्यांच्या नातवाची देखील चौकशी केली होती. त्यांच्याशी संगनमत असणाऱ्या सोबत सलील देशमुख यांनी जाणे चुकीचे ठरले पण आताचा घडीला तत्व विचार यांना काही महत्त्व देत नाही. सत्य परेशान हो सकता है, हार नही सकता पण त्यासाठी थोडी वाट पाहावी लागेल. सत्ता हे कधी सर्वस्व नसते हा विचार लक्षात ठेवला पाहिजे. सत्ता हे एक लालच आहे. सत्ता नसताना अनेकांनी लढा दिला आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, मराठी माणसाने एवढे कच्चे राहू नये, जशाच्या तसे उत्तर देण्याची आपली भूमिका असली पाहिजे. भाषेवर जर इतकी मस्ती असेल तर ती सुद्धा जिरवली पाहिजे असे कल्याण-मुलुंड लोकल प्रवासामध्ये झालेल्या कथित भाषिक वाद, मारहाण आणि त्यातून निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे १९ वर्षीय अर्णव खैरेने आत्महत्या केल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली त्यावर बोलताना दानवेंनी असे म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ नोव्हेंबर २०२५


## प्रवीण घोडेस्वार यांच्या 'गुटेनबर्गच्या सावल्या' पुस्तकाला राष्ट्रीय 'लाडली मीडिया' पुरस्कार




**नाशिक :** येथील स्तंभलेखक, सामाजिक प्रश्नांचे आणि जेन्डर स्टडीजचे अभ्यासक प्रोफेसर डॉ. प्रवीण घोडेस्वार यांच्या 'गुटेनबर्गच्या सावल्या' या पुस्तकाला राष्ट्रीय 'लाडली मीडिया and Advertising Awards for Gender Sensitivity' पुरस्कार प्रदान करण्यात आला. Population First या संस्थेच्या वतीने United Nations Population Fund (UNFPA) च्या सहकार्याने मुद्रित-इलेक्ट्रॉनिक-डिजिटल माध्यमातील आणि जाहिरातीतील लिंगभाव संवेदनशील आशयाला लाडली पुरस्कार देण्यात येतात. सुप्रसिद्ध टाटा थेएटर, National Centre for Performing Arts (NCPA), मुंबई येथे नुकत्याच संपन्न झालेल्या दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार ज्येष्ठ रंगकर्मी डॉली ठाकूर आणि नाट्य कलावंत, अभिनेत्री व दिग्दर्शक लिलीट दुबे यांच्या हस्ते प्रा. डॉ. घोडेस्वार यांना देण्यात आला.

या पुस्तकांत सन २०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रा.डॉ. घोडेस्वार यांच्या 'गुटेनबर्गच्या सावल्या' याच शीर्षकाच्या पाक्षिक सदरातील लेखांचा समावेश आहे. पुस्तकांत भारतातील आणि महाराष्ट्रातील प्रकाशन क्षेत्रातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या यशोगाथा चितारल्या आहेत. पुरुषांची मक्तेदारी असलेल्या ग्रंथ प्रकाशन संस्थेच्या चालक-मालक-सर्वेसर्वा असलेल्या या स्त्रियांच्या संघर्षगाथा या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या मुली-स्त्रियांना प्रेरणादायी आहेत.

कोल्हापूरच्या भाग्यश्री प्रकाशनाची देखणी निर्मिती असलेल्या या पुस्तकात प्रकाशक भाग्यश्री पाटील यांचीही यशोगाथा समाविष्ट आहे. प्रा. डॉ. घोडेस्वार यांना या आधी त्यांच्या लिंगभाव संवेदनशील लेखनासाठी दोनदा सन २०२१ आणि २०२२ मध्ये लाडली मीडिया पुरस्कार प्राप्त झाला आहे. आता तिसऱ्यांदा त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. या शिवाय विकासात्मक लेखनासाठीचा पत्र पंडित पा. वा. गाडगीळ पुरस्कारही त्यांना दोनदा मिळाला आहे. या पुरस्काराबद्दल इष्ट-मित्र, हितचिंतकांनी प्रा.डॉ. घोडेस्वार यांचे अभिनंदन केले आहे.

## शेतकऱ्यावर जातीय अत्याचार, चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**बुलढाणा (महेश मुंढे) :** सिंदखेडराजा तालुक्यातील लिंगा येथे कापसाचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर जातीय अत्याचार, मारहाण व जीवघेणी धमकी दिल्याची गंभीर घटना घडली, याप्रकरणी चार आरोपींविरुद्ध विविध कलमानुसार अ.जा.ज.अ.प्र. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, प्रल्हाद नामदेव साळवे वय वर्ष 59 जउळका यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. मागील काही दिवसांपूर्वीच आरोपी पवन प्रल्हाद जायभाये यांनी गुन्हा दाखल होऊ नये म्हणून समाज माध्यमावर स्वतः आत्महत्या करत असल्याचा बनावट व्हिडिओ टाकून संजय मातोंडकर ठाणेदार किनगाव राजा यांच्या बदनामीचे षडयंत्र रचले होते परंतु ठाणेदार संजय मातोंडकर यांनी अतिशय शांतपणे व्यवस्थित रीतसर तपास केला तेव्हा आरोपी प्रल्हाद आश्रुबा जायभाये व पवन प्रल्हाद जायभाये यांनी शेतकऱ्यांचे पैसे लुबाडण्यासाठी हा सर्व बनाव केल्याचे निष्पन्न झाले होते आणि आताही फिर्यादी प्रल्हाद नामदेव साळवे यांचे कापसाचे पैसे बुडवण्यासाठीच हा सर्व प्रकार केला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की दि.18 नोव्हे.2025 रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास प्रल्हाद साळवे त्यांची पत्नी गिताबाई साळवे व पुतण्या शिवाजी साळवे सर्व रा. लिंगा हे लिंगा येथे आरोपी प्रल्हाद आश्रुबा जायभाये यांचे घरी पैसे मागण्यासाठी गेले असता प्रल्हाद जायभाये यांनी त्यांची कॉलर धरून त्यांना लोटलाट केली व पवन जायभाये यांनी जातिवाचक शिवेगाळ करत " डफडे वाजवायचे काम करा ढोर काढा मांगटयांनो " असे अपमानास्पद वक्तव्य केले व आरोपी पुष्पा व ऋतुजा जायभाये यांनी फिर्यादी प्रल्हाद नामदेव साळवे यांच्या पत्नीला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली . प्रल्हाद नामदेव साळवे यांच्या माहितीनुसार व्यापारी पिता पुत्र जायभाये यांनी त्यांचा 19 क्विंटल 26 किलो कापूस विकत घेऊन त्यातील 1, 37,709 / रुपये स्वतःच्या फायद्यासाठी वापरले. याप्रकरणी कायमी अप क्र. 291 /2023 नुसार आरोपी प्रल्हाद अश्रुबा जायभाये, पवन प्रल्हाद जायभाये, पुष्पा प्रल्हाद जायभाये, ऋतुजा पवन जायभाये सर्व रा. लिंगा ता. सिंदखेड राजा यांच्याविरुद्ध 361(2) ,115(2),351(1),352,3(5)BNSसह कलम 3(2)(va) 3(1)(r)(s)अ. जा. ज. अ. प्र. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून म. पो.हे. कॉ. सोनल चव्हाण (ब. न. 1763) यांनी नोंद केली आहे पुढील तपास माननीय SDPO कदम मॅडम देऊळगाव राजा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सदर घडलेल्या घटनेमुळे शेतकरी बांधवांमध्ये नाराजी दिसत आहे आधीच नैसर्गिक आपत्ती मुळे शेतकरी अडचणीत आहे आणि त्यातच परत काही समाजकंटक व फसवे व्यापारी शेतकऱ्यांची लूट करत आहे त्यामुळे सदर घटनेत कोणावरही दया न करता कडक कारवाई करून शेतकऱ्यांना व पीडित कुटुंबाला न्याय द्यावा


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903


## डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस महाविद्यालयामध्ये संविधान महोत्सव सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**नागपूर (प्रा. डॉ. चंद्रशेखर पाटील) :** स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कामठी रोड नागपूर येथे संविधान महोत्सवा निमित्त दिनांक 22 नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२५ ला आयोजित केले आहे या संविधान महोत्सवाचे उद्घाटन दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी प्राध्यापक देविदास घोडेस्वार (संविधान समीक्षक आणि भाष्यकार) यांच्या हस्ते होणार आहे विशेष अतिथी म्हणून एड. मोहन वासनिक (अध्यक्ष पीपल वेल्फेअर सोसायटी नागपूर) आणि श्री मनोज वासनिक (सचिव, पीपल वेल्थेअर सोसायटी नागपूर) उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा बागडे उपस्थित राहतील. त्यासोबतच इतर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधान व वर्तमान लोकशाहीचे स्वरूप या थीम वर रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले आहे. दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ ला भारतीय संविधानाची अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर भीतीचित्र प्रदर्शनीचे आयोजन महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात केले आहे. दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ भारतीय संविधान व महिला सक्षमीकरण या विषयावर ही स्पर्धा आहे त्यानंतर संविधान जागर सांस्कृतिक मंच नागपूर द्वारे संविधानावर आधारित पथनाट्याचे आयोजन केले आहे.

२७ नोव्हेंबर २०२५ ला डॉ. संदेश वाघ प्रोफेसर इतिहास विभाग (मुंबई विद्यापीठ महाराष्ट्र) यांचे भारतातील वंचित समाजाचे सक्षमीकरण व संविधानात्मक तरतुदी यावर व्याख्यान आयोजित केले आहे.

त्यानंतर २५ नोव्हेंबर २०२५ ला संविधानावर आधारित प्रश्न-मंजुषा स्पर्धा आयोजित केली आहे. २८ नोव्हेंबर ला डॉ. राऊत यांचे सत्यशोधक चळवळ यावर व्याख्यान आयोजित केले आहे. याच दिवशी विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ नोव्हेंबर २०२५


## एनसीसी दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दि.२१ नोव्हेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे एनसीसी दिनानिमित महाविद्यालयात विभागातर्फे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले सर यांनी कॅडेट्सना मार्गदर्शन केले . सरांनी भाषणात आपल्या देशात एनसीसी हे सर्वात तरुण संघटन असुन देश पातळीवर शाळा, महाविद्यालयात एनसीसी हे उत्तम कार्य करत असुन देशाच्या सैनिकी , पोलीस दलात व विविध क्षेत्रात कॅडेटस भरती होऊन देशाची सेवा करत आहेत .१९४८ ला एनसीसी ची स्थापना झाली आणि तरुण संघटन निर्माण झाले यामुळेच आज जगामध्ये सर्वात तरुणाचा देश म्हणुन भारताकडे बघितले जाते . देशाच्या विकासात मोलाची युवा तरुण भूमिका बजावत आहेत कारण याच शिक्षणाच्या दरम्यान कॅडेटसना शिस्त आणि अनुशासनाचे शिक्षण दिले जाते व त्यामधुनच याचे अनुकरण करूण एक वेगळा ठसा निर्माण करतात हेच तरुण देशाला पुढे घेऊन जाण्याचे काम करत असतात . याचाच परिपाठ म्हणून पुढील शैक्षणिक वर्षा पासुन इयत्ता पहिली पासुन ते उच्च शिक्षणा पर्यंत महाराष्ट्र शासनाने एनसीसी अनिवार्य करण्याचे ठरवले आहे यासाठी पुढील वर्षी मुला , मुलींनी एनसीसी मध्ये प्रवेश घ्यावा असे आवाहन सरांनी केले . या नंतर चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले . चित्रकलेचा विषय होता 'मेरे सपनों का भारत ' स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला . प्रथम क्रमांक राठोड प्रिया ,द्वितीय इंगळे साक्षी , तृतीय सानिया शेख , उत्तेजनार्थ पंकज जमादार, भोसले रवि, भोसले गणेश स्पर्धक यांचा सत्कार करण्यात आला .या वेळी मंचावर डॉ विनोद देवरकर, डॉ चंद्रसेन करे होते . सुत्रसंचलन ,प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले व आभार कॅडेट रिहान मनियार यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, कॅडेटस या कार्यक्रमासाठी उपस्थित होते .

## पीईएस महाविद्यालयाचा चमकदार झेंडा! सेंट्रल झोन स्पर्धेत रिले व थाळीफेकमध्ये ब्राँझची कमाई




**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक १७ व १८ नोव्हेंबर रोजी पी इ एस शारीरिक शिक्षण महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, येथे संपन्न झालेल्या सेंट्रल झोन ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या शंभर मीटर रिले स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने ब्रान्झ मेडलची कमाई केली या संघात निखिल सुरसे, जयकुमार साळवे, सौरभ शिंदे व निखिल सदावर्ते या खेळाडूंचा समावेश होता तसेच महिलांच्या थाळीफेक या क्रीडा प्रकारात वैष्णवी कांबळे हिने ब्रांन्झ मेडल जिंकले त्यांच्या या यशाबद्दल डीवायएसपी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. यावेळी प्राचार्य कविता प्राशर, एलसीबी विभागाचे श्री. संजय सोनवणे मार्गदर्शक डॉ भिकूलाल सले, क्रीडा समिती सदस्य डॉ. कुणाल देशपांडे, डॉ.भारत उगले, प्रा. अभिषेक ढेंबरे यांच्यासह पोलीस विभागाचे प्रशिक्षक उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्यांकडून जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट




**कन्नड (अरुण थोरात) :** एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मदत करण्याचे आवाहन १९९६ आं. ब. मुळांचे हायस्कूल या व्हाट्सअप ग्रुपवर हिरालाल पाटील यांनी केले होते. त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन व्हाट्सअप ग्रुप वरील सर्व सदस्यांनी या मोहिमेला सुरुवात केली. मराठवाड्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कन्नड नं १ मराठी व कन्नड नं ३ च्या पटावरील सर्व विद्यार्थ्यांना १९९६ च्या बॅच इ.१० वी चे आ.बं.मुळाचे हायस्कुल चाळीसगांव च्या माजी विद्यार्थ्यांकडून जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्यात पॅड, चित्रकला वही, एक रेघी वही, चौकटा वही, कंपास, उजळणी पुस्तक, पेन, पेनपाऊच, रंग पेटी आदी साहित्यप्रशालेचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी धर्मराज खैरनार, राहूल डुकरे, सतिष कोळी, कल्पना सूर्यवंशी, सुवर्णा गायके, फरहीन पठाण सह कन्नड नं १ मराठी व कन्नड नं ३ या शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. एकाच वेळी ९ ते १० साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेह-यावरचा आनंद द्विगुणित झाला होता. यावेळी दिलीप गायकवाड यांनी १९९६ च्या बॅच सदस्यांचे कौतुक केले. यासारखे समाज उपयोगी उपक्रम त्यांनी नेहमी राबवावेत असे प्रतिपादन केले. सतिष कोळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन या बॅचच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे आभार मानून त्यांच्या प्रेरणादायी उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले की,१९९६ आं.ब. मुळांचे हायस्कूल चाळीसगाव या बॅचच्या सदस्यांनी आतापर्यंत गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचा उपक्रम दरवर्षी नगरपालिका शाळेत राबविण्यात आला आहे. मतिमंद शाळेला मदत तसेच पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत यासारखे उपक्रम ते दरवर्षी राबवत असतात. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा गायके यांनी केले तर आभार कल्पना सूर्यवंशी यांनी मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ नोव्हेंबर २०२५



## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


# अभ्यासात वेळेचे नियोजन

**विद्यार्थी** जीवन हे आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे टप्पा असतो. या काळात शिकलेले ज्ञान, सवयी आणि अनुभव आपले भविष्य घडवतात. म्हणूनच या काळात वेळेचे योग्य नियोजन करणे खूप गरजेचे आहे. "वेळ गेली की पुन्हा येत नाही" — ही म्हण आपल्याला वेळेचे महत्त्व सांगते. ज्याने वेळेचे नियोजन शिकले, त्याने यश मिळवण्याचा अर्धा प्रवास पूर्ण केला असे समजा.

**वेळेचे महत्त्व-**

वेळ ही आपल्याकडे असलेली सर्वात मौल्यवान गोष्ट आहे. ती कुठे विकत मिळत नाही आणि एकदा गेली की परत येत नाही. पैसे गमावले तर पुन्हा मिळू शकतात, पण वेळ गमावली तर ती कायमची निघून जाते. म्हणूनच, प्रत्येक क्षणाचा उपयोग योग्य कामासाठी करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांसाठी वेळ म्हणजेच संधी. ज्याने वेळेचा योग्य उपयोग केला, तो अभ्यासात, स्पर्धेत आणि जीवनातही पुढे जातो. वेळेचे नियोजन न केलेल्या विद्यार्थ्यांना शेवटच्या क्षणी घाई, तणाव आणि पश्चात्ताप सहन करावा लागतो.

**वेळेचे नियोजन केल्याने:**

अभ्यासासाठी ठराविक वेळ मिळतो लक्ष केंद्रित राहते, तणाव कमी होतो, आणि आत्मविश्वास वाढतो. नियोजन केलेल्या विद्यार्थ्याला काय करायचे आहे हे स्पष्ट ठरते, त्यामुळे त्याचा वेळ वाया जात नाही.

**वेळेचे नियोजन कसे करावे?**

वेळेचे नियोजन करणे कठीण नाही. खाली काही सोप्या गोष्टी दिल्या आहेत:

१. दिवसाचे वेळापत्रक बनवा. सकाळपासून रात्रीपर्यंत काय करायचे ते लिहून ठेवा. अभ्यास, खेळ, जेवण, झोप आणि मनोरंजन यासाठी वेगवेगळा वेळ ठरवा.

२. अवघड विषय आधी शिका. सकाळी मन ताजेतवाने असते, त्यामुळे अवघड विषय त्या वेळी अभ्यासा. सोपे विषय नंतर घ्या.

३. थोडी विश्रांती घ्या. सतत दोन-तीन तास अभ्यास केल्याने थकवा येतो. दर तासाभराने ५-१० मिनिटांची विश्रांती घ्या.

४. वेळ वाया घालवू नका. मोबाइल, टीव्ही, गेम्स आणि सोशल मीडिया या गोष्टी वेळ खातात. अभ्यासाच्या वेळी त्या पूर्णपणे बंद ठेवा.

५. दररोज झोपायच्या आधी दिवसभरात काय शिकलो ते थोडक्यात पुन्हा वाचा. त्यामुळे आठवण दृढ राहते.

**वेळ आणि शिस्त-**

वेळेचे नियोजन शिस्तीशिवाय शक्य नाही. शिस्त म्हणजे ठरवलेल्या वेळेचे काटेकोर पालन करणे. वेळापत्रक बनवले तरी ते पाळले नाही, तर त्याचा काही उपयोग नाही. दररोज ठराविक वेळी उठणे, अभ्यास करणे, आणि विश्रांती घेणे. ही सवयच आपल्या यशाची गुरुकिल्ली ठरते. शिस्तबद्ध विद्यार्थी शिक्षकांचा आवडता होतो आणि त्याच्याकडे सगळे आदराने पाहतात. तो स्वतःवर नियंत्रण ठेवतो, त्यामुळे त्याचे मन एकाग्र राहते.

**- वेळेचे नियोजन आणि यश-**

वेळेचे नियोजन केल्याने विद्यार्थी आपली उद्दिष्टे वेळेत पूर्ण करू शकतो. जेव्हा अभ्यास व्यवस्थित आणि नियोजित असतो, तेव्हा तणाव कमी होतो आणि आत्मविश्वास वाढतो.

परीक्षा जवळ आली तरी घाई राहत नाही, कारण सर्व काही आधीच शिकलेले असते. अनेक यशस्वी लोकांनी वेळेचे नियोजन हेच त्यांच्या यशाचे रहस्य सांगितले आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सांगितले होते — "स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वेळेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. "त्यांनी प्रत्येक मिनिटाला अर्थ दिला आणि म्हणूनच ते महान शास्त्रज्ञ व राष्ट्रपती झाले.

**◇ अभ्यासात वेळेचे नियोजन केल्याने होणारे फायदे-**

१. अभ्यास व्यवस्थित आणि नियोजित होतो.

२. तणाव कमी होतो आणि आत्मविश्वास वाढतो.

३. एकाग्रता वाढते आणि विषय लवकर समजतो.

४. परीक्षा काळात घाई होत नाही.

५. गुण सुधारतात आणि शिक्षक-पालक समाधानी राहतात.

६. सर्वात महत्त्वाचे म्हणजे — स्वतःवर विश्वास निर्माण होतो.

वेळ ही आपल्याला मिळालेली सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. ती कोणासाठी थांबत नाही. जो विद्यार्थी वेळेचा आदर करतो, तो जीवनात नक्की पुढे जातो. अभ्यासात वेळेचे नियोजन हे फक्त अभ्यासासाठी नव्हे, तर संपूर्ण आयुष्यासाठी महत्त्वाचे आहे. कारण ज्या व्यक्तीने वेळेवर नियंत्रण मिळवले, ती व्यक्ती स्वतःच्या भविष्यावर नियंत्रण मिळवते. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने ठरवावे —"मी वेळेचे नियोजन करीन, वेळेचा योग्य उपयोग करीन आणि माझे स्वप्न पूर्ण करीन. "वेळ हीच यशाची गुरुकिल्ली आहे. तिचा योग्य उपयोग करा आणि तुमचे जीवन उजळवा.




विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड
परभणी
मो.९०९६०७५६३०


## तापलं शिवार

उभ्या जीवनाचं
पडलंय कोडं
उत्तर हे धड
सापडेना

फिरला नांगर
मोडलंय घर
तापलं शिवार
आयुष्याचं

खुणा नांगराच्या
मातीच्या पोटात
व्यथा काळजात
माऊलीच्या

मायेच्या चुलीची
झाली माती माती
उदासली माती
माय जाता

तुटता हे घर
कोरडे अंगण
दुभंगलं मन
शिणलेलं


ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो.9403384889


## आवडती केळी

बाबांनी आणली
बाजारातून केळी
आवडीने खातात ते
भुकेल्या वेळी

पिवळी धमक केळी
गोड ताजी ताजी
मिटक्या मारीत खाते
एकादशीला आजी

भूक लागली की दादा
केळी करतो गट्ट
खाऊन खाऊन कसा
झाला किती लठ्ठ

छिटेवाली केळी
आजोबाला आवडे भारी
लपून छपून खातात
मधुमेह असला तरी

कच्च्या केळीचे चिप्स
तळत बसते ताई
थंड होण्याआधीच
खायची सुटते घाई

दूध केळीचे शिकरण
आई करते मस्त
वाटी वाटी पिऊन
करतो मी फस्त




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ नोव्हेंबर २०२५

# भिक्खू ज्ञानज्योती महाथेरो यांच्या हस्ते 'परियत्ती' ग्रंथाचे अनावरण



डॉ. म. सु. पगारे यांच्या सुवर्ण महोत्सवी पुस्तक सोहळयाच्या निमित्ताने एकूण ५० पुस्तकांचे जे निर्माण कार्य झालेले आहे त्यानिमित्ताने ग्रंथ प्रकाशन सोहळा करण्यात आलेला आहे. यानिमित्तानेपरियत्ती पटीपत्ती आणि पटीवेधन या तीन संकल्पना बुद्ध धम्मामध्ये ज्ञान संवर्धक म्हणून अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामध्ये परियत्ती या संकल्पनेच्या निमित्ताने सूक्ष्मपणाने ज्ञान ग्रहण करणे व सत्याच्या आधारावरती तपासलेले हे ज्ञान आचरणामध्ये आणून त्याला विकसित करण्याची प्रक्रिया करणे याला अत्यंत महत्त्व आहे त्यामुळे प्रज्ञाच्या वाटचालीसाठी परियत्तीची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका आपल्या लक्षात येते. या ग्रंथाच्या माध्यमातून बुद्ध धम्माच्या अभ्यासकांना चांगल्या पद्धतीने आचरणातील अभ्यास करता यावा यासाठी सुप्रसिद्ध लेखक, मानवतावादी विचारवंत डॉ.म.सू.पगारे यांचा परियत्ती हा ग्रंथ सिद्ध झालेला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन ताडोबा अभयारण्यामध्ये वाघ चित्ता सर्प अशा प्राण्यांसोबत मंगलमैत्रीने राहाणारे धुतांगधारी भिक्खू ज्ञानज्योती महाथेरो यांच्या हस्ते झालेले आहे त्यांच्यासोबत अध्यक्षस्थानी बडा भंते म्हणून आदराने सिनिअर भिकू आनंद भंते यांचा आदरानेउल्लेख केला जातो ते अध्यक्षस्थानी होते.तसेच भिक्खूसंघ देखील या प्रकाशन सोहळयामध्ये सहभागी झालेला होता परियत्ती या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने भिक्खू ज्ञानज्योती महाथेरो म्हणाले की शुद्धी ही अत्यंत महत्त्व महत्त्वाची आहे. शीलशुद्धीच्या माध्यमातून एकाग्रता समाधी आणि ज्ञानसंवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. तथागत भगवान बुद्धांनी जे लोकोत्तर ज्ञानाचे संशोधन अडीच हजार वर्षांपूर्वी केलेले आहे, त्या अनुषंगाने थोड्या थोड्या प्रमाणात अलीकडे वैज्ञानिक संशोधन करताना दिसत आहेत. परंतु लोकोत्तर ज्ञानाचे संशोधन अजून पर्यंत देखील वैज्ञानिकांना करता येत नाही. परियत्ती या ग्रंथामधील कलाप ही संकल्पना लोकोत्तर ज्ञानाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची आहे.डॉ.म.सु. पगारे यांनी या ग्रंथांमध्ये बुद्ध धम्म अतिशय सूक्ष्म पद्धतीने समजावून सांगण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. यावेळी अध्यक्षपदावरून विवेचन करताना एन आनंद महाथेरो यांनी सांगितले की परियत्ती हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा असून बुद्ध धम्मा मधील धम्म समजून घेण्याची ही अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रिया मानता येईल. त्या अनुषंगाने डॉ. म.सु. पगारे यांनी केलेले हे लेखन जे आहे ते सर्वच अभ्यासकांनी बारकाईने वाचणे आणि आचरणात आणणे गरजेचे आहे अन्यथा आचरणात न आणलेले आणि समजून न घेतलेले लेखन हे विकसित करणारे कसे ठरू शकेल बुद्ध आणि त्यांचा धम्म हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेला जो ग्रंथ आहे त्या ग्रंथातील असणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टी यादेखील वाचून सूक्ष्म पद्धतीने करून आचरणात आणल्या पाहिजेत. त्यातील काही प्रमाणातल्या असणाऱ्या धम्माच्या समजून घेणाऱ्या अर्थच्छटा या ग्रंथामध्ये देखील आहेत. त्यामुळे अतिशय महत्त्वपूर्ण लेखन केलेला हा ग्रंथ डॉक्टर मसु पगारे यांनी जो सिद्ध केलेला आहे तो चांगल्या पद्धतीने समजून घेऊन आपल्या आचरणामध्ये आणण्याचा प्रयत्न केला तर तो अधिक लाभदायी आणि फलदायी होणारा ठरतो यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक भिक्खूगण आणि उपासक-उपासिका उपस्थित होते. ताडोबा अभयारण्यातील धम्मचेती भंते जळगाव येथील धम्मदर्शी भंते तसेच भागवत सपकाळे चेतन नन्नवरे दीपंकर पगारे कैलास पाटील अशा अनेक अभ्यासू उपासकांची उपस्थिती या कार्यक्रम प्रसंगी आणि यशस्वीतेसाठी लाभलेली होती.

# आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेल्या व्यक्तींच्या वास्तवाचा समाजशास्त्रीय मागोवा

**मा**नवी जीवनाची रचना ही भावनिक नातेसंबंध, सामाजिक मूल्ये, आर्थिक अपेक्षा आणि मानसिक आरोग्याच्या विविध स्तरांवर उभी आहे. या सर्व घटकांच्या गुंफणीत कधी कधी असा क्षण येतो, जेव्हा एखादी व्यक्ती जीवनाचा प्रवास संपवण्याचा निर्णय घेते. आत्महत्या ही केवळ वैयक्तिक न राहता खोलवर सामाजिक परिणाम घडवणारी घटना असते. एखादी व्यक्ती या जगातून जाताना मागे ठेवून जाते ती फक्त आठवण नाही, तर भावनिक धक्क्यांनी विदीर्ण झालेले जीवन, अपराधगंडाने झाकलेली शांतता, सामाजिक चौकटींच्या चौकशीचा भार आणि भविष्याच्या असुरक्षिततेची काळोखी पोकळी. म्हणूनच अमेरिकेतील थँक्सगिव्हिंग दिवसाच्या अगोदरचा शनिवार म्हणजेच यंदा 22 नोव्हेंबर रोजी जगभर 'आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेल्या व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय दिन' (International Survivors of Suicide Loss Day) म्हणून पाळला जातो. हा दिवस मागे उरलेल्या लोकांसाठी सांत्वनाचा, समाजासाठी आत्मपरीक्षणाचा आणि मानवी संवेदनशीलतेसाठी स्मरणरूप दिपस्तंभ आहे.भारतीय समाजात नातेसंबंधांचे, कुटुंबप्रणालीचे आणि सामूहिक भावविश्वाचे महत्त्व अतूट आहे. अशा पायाभूत रचनेत आत्महत्येची घटना ही कुटुंबाला पूर्णपणे हादरवून टाकणारी असते. मृत व्यक्तीचा वेदनादायी शेवट पुस्तकी व्याख्येत "आकस्मिक घटना" म्हणून मांडता येईल, परंतु कुटुंबासाठी तो अमानवीक वेदनेचा दीर्घकालीन प्रवास असतो. सर्वात गुंतागुंतीची गोष्ट म्हणजे, प्रिय व्यक्तीने आपले जीवन संपवण्यामागील कारणे अनेकदा धूसर राहतात. कोणत्याही स्पष्ट वाटणाऱ्या कारणांमागे अदृश्य ताण, मानसिक आरोग्याची नाजूक स्थिती, सामाजिक अपेक्षा, अपयशाची भीती, आर्थिक कोंडी, बेरोजगारी, प्रेम प्रकरण, नातेसंबंधातील दडपण किंवा एकाकीपणाची असह्य भावना लपलेली असू शकते. त्यामुळे या मृत्यूचे ओझे फक्त शोकाचे नसते; ते अनुत्तरित प्रश्नांचे, गोंधळाचे आणि न सांगता निघून गेलेल्या वेदनेचे असते.समाजशास्त्रीय विचारवंत एमिल दुर्खीम यांनी आत्महत्येचे विश्लेषण करताना सांगितले आहे की आत्महत्या ही घटना सामाजिक एकात्मता आणि सामाजिक नियमनाशी थेट जोडलेली असते. व्यक्ती समाजाच्या मूल्यांपासून, भावनिक आधारापासून किंवा सामाजिक संरचनेपासून अलग झाली की आत्महत्येचा धोका वाढतो. परंतु, आत्महत्येनंतर उरलेल्या कुटुंबीयांवर सामाजिक वातावरण ज्या प्रकारे प्रतिक्रिया देते, तेही तितकेच समाजशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचे आहे. आपल्याकडे अजूनही आत्महत्येकडे कलंक, पाप, चूक, कमजोरी किंवा "कुटुंबाची बदनामी" अशा दृष्टीने पाहिले जाते. परिणामी, मृताच्या कुटुंबाला समाजाकडून टाळाटाळ, कुजबुज, संशय, टीका आणि अप्रत्यक्ष दोषारोप सहन करावा लागतो. "काही दिसलं नाही का?", "इतका ताण कसा घेतला?", "घरात काय बिनसलं होतं?" अशा प्रश्नांतून समाज नकळतपणे मानसिक हिंसा करत असतो. हा सामाजिक दबाव त्या कुटुंबाला आणखी खोल एकाकीपणात ढकलतो.कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर या घटनेचा परिणाम वेगवेगळा असतो. पालकांसाठी हे स्वतःच्या एका भागाच्या मृत्यूसारखे असते. जोडीदारासाठी ते आयुष्याच्या स्तंभाचा कोसळलेला आधार असतो. मुलांसाठी ते सुरक्षिततेची आणि विश्वासाची नष्ट झालेली छाया असते. भावंडांसाठी ते नात्याची अचानक तुटलेली साखळी असते. अनेक अभ्यासांनुसार आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेल्या व्यक्तींमध्ये नैराश्य, चिंता, गुंतागुंतीचा शोक (complicated grief), अपराधगंड, आत्मविश्वासाचा अभाव आणि स्वतःच्या ओळखीबद्दल संभ्रम यांचे प्रमाण अधिक असते. हा प्रसंग "कसा झाला असेल?", "का झाले?", "मी काय करू शकलो असतो?" अशा अनंत प्रश्नांचा मानसिक संघर्ष असतो.विशेषतः मुलांवर याचा परिणाम अत्यंत संवेदनशील असतो. पालकांपैकी एकाने स्वतःचे जीवन संपवले, तर मुलांना असुरक्षितता, भीती, अपराधगंड, राग, नियमभंग, अभ्यासात ढिलाई, एकटेपणा आणि मानसिक अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या मनात "माझ्यासाठी ते का थांबले नाहीत?" असा खोलवर जळजळीत प्रश्न जन्म घेतो. त्यामुळे अशा मुलांना समुपदेशन, भावनिक आधार, खुला संवाद आणि परिस्थिती समजावून सांगण्याची अत्यावश्यक गरज असते.ग्रामीण भारतात आत्महत्येनंतरचा सामाजिक दबाव अधिक तीव्र असतो. आत्महत्या ही अजूनही वर्ज्य विषय मानली जाते. अनेक ठिकाणी मृत व्यक्तीच्या कुटुंबाकडे संशयानं पाहिलं जातं. काहीवेळा अंधश्रद्धा, दैवी कोप, भूतबाधा, वाईट नजर, अशा स्पष्टीकरणांचा आधार घेतला जातो. आत्महत्येने मृत व्यक्तीच्या अंत्यविधीत देखील काही ठिकाणी भेदभाव केला जातो. कुटुंबाला सण-समारंभात, गावकऱ्यांमध्ये, नात्यात, चौकात पाहिल्या जाणाऱ्या कुजबुजीतून दिवसेंदिवस मानसिक जखमांवर मीठ चोळलं जातं. शहरांमध्ये वातावरण काहीसं वेगळं असलं तरी सामाजिक अंतर वाढल्याने एकाकीपणा आणि भावनिक तुटकता अधिक तीव्र दिसते. कुटुंबाला हवा असते तो आधार, संवेदनशीलता आणि समज. पण मिळते ती शांतता, दुर्लक्ष किंवा औपचारिक सहानुभूती.आत्महत्या ही घटना केवळ भावनिक नसून आर्थिक आणि सामाजिक रचनेवरही खोल परिणाम करणारी असते. अनेक वेळा मृत व्यक्ती घरातील कमावता सदस्य असतो. त्याच्या अचानक जाण्यामुळे कुटुंबाचा आर्थिक समतोल पूर्णपणे बिघडतो. कृषी क्षेत्रातील संकट, बेरोजगारी, कर्जताण यांच्या पार्श्वभूमीवर आत्महत्येचे प्रमाण वाढते आणि त्यामुळे मागे उरणाऱ्या कुटुंबांना कर्ज, नोकरी, मुलांचे शिक्षण, आरोग्य, दैनंदिन गरजा अशा मूलभूत गोष्टींची तातडीची लढाई लढावी लागते. सरकारी योजना असल्या तरी त्यांचा लाभ मिळवताना प्रक्रिया जटिल, कागदोपत्री आणि वेळखाऊ असते. त्यामुळे कुटुंब भावनिक धक्क्यासोबतच आर्थिक संघर्षातही अडकते.या दिवसाचे महत्त्व इथेच अधोरेखित होते. हा दिवस सांगतो की आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेले लोक समाजात अदृश्य नाहीत. त्यांची वेदना खऱ्या आहेत आणि त्यांना समजून घेणे, मान्यता देणे आणि साथ देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. हेही लक्षात घ्यावे लागते की मानसिक आरोग्याविषयीची भीती, लाज, कलंक हे आजही मोठे अडथळे आहेत. जोवर मानसिक आरोग्य समस्या 'कमजोरी' मानली जातील, तोवर आत्महत्या एकलकोंडेपणाचा मार्ग राहील आणि त्यानंतरचे सामाजिक आघात अधिक भीषण होतील.मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, कुटुंबाला समुपदेशन, सपोर्ट ग्रुप, समुदाय पातळीवरील जागरूकता, शाळा-महाविद्यालयांमध्ये भावनिक आरोग्य शिक्षण, कार्यस्थळांवर ताणनियंत्रण कार्यक्रम, ग्रामीण भागात आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, कुटुंबांना आर्थिक सहाय्य ही सर्व पावले अत्यंत महत्त्वाची आहेत. आत्महत्येमुळे झालेल्या मृत्यूंना रोखणे हा एक भाग आहे; पण त्यानंतर मागे राहिलेल्या कुटुंबांना पुन्हा उभे करणे हा दुसरा, अनेकदा दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वपूर्ण भाग आहे. समाजाने त्यांच्यासोबत उभे राहण्यासाठी संवेदनशीलता, सहानुभूती आणि समज वाढवली तर त्यांच्या पुनर्बांधणीचा प्रवास सुकर होऊ शकतो.या दिनाचे सर्वात मोठे महत्त्व असे की तो आपल्या सामाजिक मूल्यांचे पुनर्मूल्यांकन करण्यास भाग पाडतो. आपण नातेसंबंधांच्या नाजूकतेकडे किती प्रतिसाद देतो? आपण भावनिक संकटांचा सामना करणाऱ्या व्यक्तींना किती समजून घेतो? कुणाच्या अंतरी चाललेला संघर्ष आपणास किती दिसू शकतो? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आम्ही, समाज म्हणून, दुःखाच्या काळात कुणासाठी आधारवड होऊ शकतो का? हा दिवस सांगतो की प्रत्येक शोकाच्या मागे अक्षम्य वेदना दडलेली असते; आणि प्रत्येक वेदनेच्या मागे समजून घेण्याची आणि आधार देण्याची संधी असते.शेवटी, आत्महत्या हा शेवट असू शकतो, परंतु मागे उरलेल्या व्यक्तींचा प्रवास हा नव्या सुरुवातीचा असतो. अवघड, वेदनादायी, पण शक्य. योग्य सामाजिक आधार, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता आणि मानवी संवेदनशीलता यांच्या मदतीने ते पुन्हा जगण्याचा मार्ग शोधू शकतात. या दिवसाचा संदेश अत्यंत स्पष्ट आहे की दुःखाला शब्द द्या, वेदनेला मान्यता द्या, आणि माणुसकीने माणसाजवळ उभे राहा. कारण कधी कधी फक्त एक ऐकणारे कान आणि एक समजून घेणारा हातही एखाद्याच्या पुनर्जन्माचा आधार ठरू शकतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ नोव्हेंबर २०२५

# 'जल्लोष लोककलेचा' महोत्सवाचा भव्य शुभारंभ नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते

















**छत्रपती संभाजीनगर :** बालरंगभूमी परिषद,मुंबईतर्फे आयोजित 'जल्लोष लोककलेचा' या महोत्सवाचे उद्घाटन परिषदेच्या अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते संपन्न झाले.शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन आणि स्पर्धांना सुरुवात झाली.या वेळी नीलम शिर्के सामंत यांनी बालरंगभूमीच्या विविध उपक्रम आणि कार्यक्रमांची माहिती उपस्थित बाल कलाकारांना देत त्यांच्याशी हृदय संवाद साधला.या स्पर्धांचे दुसरेच वर्ष असले तरी बालकलाकारांचा उत्साह प्रचंड दांडगा असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.मराठवाड्यातील बालकलाकारांचा सहभाग आणि उदंड प्रतिसाद असल्याचे पाहून नीलम शिर्के-सामंत यांनी समाधान व्यक्त केले.भविष्यातील बालरंगभूमीच्या विविध कार्यक्रमांची माहिती यावेळी त्यांनी दिली.मंचावर संभाजीनगरचे अध्यक्ष आसेफ अन्सारी, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. हसन इनामदार, उपाध्यक्ष वाल्मिक जाधव, प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड,कोषाध्यक्ष विनोद आघाव, सहकार्यवाह अर्चना देवधर, सहकार्यवाह संतोष कुलकर्णी,कार्यकारणी सदस्य लक्ष्मण अहिरे,रमेश सोळंके, प्रा. रामेश्वर झिंजुर्डे, प्रा. श्रीपाद पदे, डॉ.असलम शेख,ऍड.सुशील बनकर, सल्लागार भाग्यरवी कुलकर्णी यांची उपस्थिती होती.यावेळी उपरोक्त नूतन कार्यकारणीचे स्वागत नीलम शिर्के-सामंत यांनी करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर समूह नृत्य, एकल नृत्य, एकल गायन, एकल वादन आणि समूह गायन या स्पर्धा अतिशय रंगतदार झाल्या.या महोत्सवातील विविध स्पर्धांचे परीक्षण केतन पवार , प्रणाली अंभोरे , प्रा. रमेश रविराज पवार व प्रा.योगेश गच्चे यांनी केले. कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी डॉ. जयंत शेवतेकर महानगरपालिकेचे सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी शंभू विश्वास यांची उपस्थिती होती. अतिशय रंगतदार स्पर्धा महोत्सवातसमूह नृत्य स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पुरस्कार गायकवाड ऑलंम्पियाड प्री स्कुल , उत्कृष्ट सुभेदार रामजी आंबेडकर हायस्कुल, उत्तम भगवान महावीर स्कुल, तर प्रसंशनिय श्री. तुळजाभवानी प्राथमिक विद्यालय आणि नभरंग प्रतिष्ठान हे पुरस्काराचे मानकरी ठरले. एकल नृत्य स्पर्धेत सर्वोत्कृष्ट आरुषी वाकळे, उत्कृष्ट वेदांत वाघमोडे, उत्तम आरोही पैठणे तर प्रसंशनीय पुरस्कार पार्थ गिरीश पारिवाल आणि अमृता नलावडे यांना पुरस्कार मिळवला. एकल वादन स्पर्धेत कृष्णा बेंद्रे प्रशंसनीय पुरस्कार प्राप्त ठरला. एकल गायन स्पर्धेत निशांत देशमुख सर्वोत्कृष्ट, वेदांत शेळके उत्कृष्ट, परी तेलंग उत्तम , भाविक सुरडकर आणि शौर्य रघुडे यांना प्रशंसनीय पुरस्कार मिळाला समूह गीत गायन स्पर्धेत लोककला अध्यासन केंद्र गरवारे कम्युनिटी सेंटर यांना प्रशंसनीय पुरस्कार मिळाला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.महेश अचिंतलवार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालरंगभूमीच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.